दिनांक १६/०७/२०१९



नियमित दिवाणी मुकदमा क्र.९७/२०१५
नि. ३३ लगत

शपथेवर सुरू

उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ सौ. एन्.एस्.रांगणेकर यांचेमार्फत

हे म्हणणे खरे नाही की, मी साक्ष देण्यासाठी आलेल्या जमीनीचा सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, त्याचे निश्चित क्षेत्र मी सांगू शकत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, स.नं. ९२ हि.नं. १ या जमीनीचा मी मालक नाही व त्याच्याशी माझा संबंध नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील ''स.नं. ९२ हि.नं. १ गांव पुळास ही मिळकत माझ्या मालकीची आहे '' हा मजकूर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, किती क्षेत्रापुरते मी साक्ष देण्यासाठी आलो हे मला सांगता येणार नाही. पुळास गांवातील स. क्र. ९२ हि.क्र. १ या मिळकतीला लागूनच पूर्वी माझे रहाते घर होते असे दाखवणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्या हिश्श्यामध्ये माझे घर होते हे मी सांगू शकत नाही. माझ्या म्हणण्यानुसार माझे घर स. क्र. ९४ हि.क्र. ३ मध्ये होते. हे म्हणणे बरोबर आहे की, साक्ष देण्यासाठी आलेल्या जमिनीच्या चारही बाजूस असलेल्या जमिनींचा सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर मी सांगू शकत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, स.नं. ९२ हि.नं. १ हि जमीन मुळ आकारीपड जमीन आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या जमीनी एकसाली कुळ या पध्दतीने वहिवाटीसाठी दिल्या जातात. हे म्हणणे बरोबर आहे की, स.नं.९२ हि.नं. १ मधील जमीन शासनाने वादीला दिलेली असून त्याचा सातबारा त्यांच्या नांवे झालेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, स.नं. ९२ हि.नं. १ या जमीनीमध्ये प्रतिवादींची कब्जाभोग्य वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यात त्यांच्या उठवणीची झाडे व घर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे व माझे वाद आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, सरतपासातील नमुद जमीनीमध्ये वादीने उठवलेली झाडे असल्याचे दाखवण्यासाठी माझ्या तोंडी शब्दांव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, नागू लांबर व बाबू झोरे हे एका समाजातील व्यक्ती आहेत. ते एकमेकांचे नातेवाईक आहेत किंवा कसे हे मला माहिती नाही.

नियमित दिवाणी मुकदमा क्र.९७/२०१५

नि. ३३ लगत

हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील नमुद जमीनीमध्ये वादींची कब्जे वहिवाट व लागवड असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीनीस वादींचे कुंपण असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी सदर जमीनीतून कधीही उत्पन्न घेतले नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, वादींशी माझे चांगले संबंध आहेत व आम्ही एकमेकांकडे जातो. हे म्हणणे खरे नाही की, वादींशी चांगले संबंध असल्याने व प्रतिवादींशी वाईट संबंध असल्याने मी खोटया मजकुराचा सरतपास दाखल करून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—
(एस्. ए. कानशिडे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.

दिनांक :—१६/०७/२०१९.